# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी -४ महाराष्ट्र विपीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनिम क्रमांक (६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (महाविद्यालयीन व विद्यापीठ विकास विभाग)

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पेक्स, गडचिरोली ४४२६०५

फोन /फॅक्स नंबर ०७१३२ - २२३१०४ Email-gug.registrar@gmail.com


गो.वि./मविविवि/ ८८६१ /२०२३ दिनांक: / १०/२०२३ 06/11/2023

## परिपत्रक

विषय - १०० टक्के केंद्रपुरस्कृत महाविद्यालय व विद्यापीठामधील विद्यार्थ्यांसाठी सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती ची नॅशनल स्कॉलरशिप पोर्टल मार्फत सन २०२३-२४ साठी अमंलबजावणी करणे बाबत.

संदर्भ - शिक्षण संचालनालय उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत पुणे-४११ ००१ यांचे पत्र क्र.१०२४१ दि.१३ ऑक्टोंबर, २०२३

विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांना कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक इयत्ता १२ वी परीक्षेमध्ये कला, वाणिज्य व विज्ञान तसेच व्यावसायीक या विद्याशाखांमधील उच्चतम गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांना पुढील पदवी व पदव्युत्तर शिक्षणासाठी भारत सरकारची सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्रराज्य, पुणे यांचेतर्फे राबविण्यात येते. सदर शिष्यवृत्तीसाठी केंद्रशासनाकडुन महाराष्ट्र राज्यासाठी ७४१७ इतके नवीन मंजूरीसाठी संच निर्धारीत केलेले आहे. **केद्रशासनामार्फत नवीन शिष्यवृत्तीसाठी व नुतनीकरणासाठी विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज करण्याची शेवटची मुदत दिनांक ३१.१२.२०२३ अशी निर्धारित करण्यात आलेली आहे.**

**त्याअनुषंगाने विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना संदर्भीय पत्राचे अवलोकन करून अवगत करावे तसेच जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती चा लाभ होण्यासाठी प्रेरित करावे, हि विनंती.**

**सहपत्र : संदर्भीय पत्र**

**डॉ.अनिल हिरेखण**
**कुलसचिव**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

**प्रति,**

**मा. प्राचार्य**
**सर्व संलग्नित महाविद्यालये**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

**प्रतिलिपी,**

१) **मा. कुलगुरु महोदय, यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.**
२) **मा. प्र-कुलगरु यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.**

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. 9083 दि. 16/10/23
जावक क्र. ...... दि. ......

# महाराष्ट्र शासन
# शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
# महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.

web: www.dhepune.gov.in E-mail: schol.dhepune@gov.in
फोन नं.०२०/२६१२६९३९ /२९७०७०९८ फॅक्स ०२०/२६१११९५३

क्र.उशिसं/शिष्य-२०२३-२४/सीएसएस/ 10241 दि. 13 OCT 2023

**परिपत्रक**

**विषय :- १०० टक्के केंद्रपुरस्कृत महाविद्यालय व विद्यापीठामधील विद्यार्थ्यांसाठी सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती ची नॅशनल स्कॉलरशिप पोर्टल मार्फत सन २०२३-२४ साठी अंमलबजावणी करणे बाबत...**
**संदर्भ :- केंद्रशासनाचे दिनांक २९.०९.२०२३ रोजीचा ई-मेल.**

उच्च माध्यमिक ( इयत्ता १२ वी) परीक्षेमध्ये कला, वाणिज्य व विज्ञान तसेच व्यावसायिक (Vocational) या विद्याशाखांमधील उच्चतम गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांना पुढील पदवी व पदव्युत्तर शिक्षणासाठी भारत सरकारची सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेतर्फे राबविण्यात येते. सदर शिष्यवृत्तीसाठी केंद्रशासनाकडून महाराष्ट्र राज्यासाठी ७४१७ इतके नवीन मंजूरीसाठी संच निर्धारित केलेले आहेत. या योजनेचा लाभ राज्यातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना घेता यावा यासाठी **नविन मंजूरीचे आणि नूतनीकरणाचे (Renewal) अर्ज ऑनलाईन (Online) पध्दतीने** मागविण्यात येत आहेत. ऑफलाईन (Offline) पद्धतीने भरलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत. नवीन मंजूरीसाठी केंद्रशासनाकडून गुणवत्ता यादी (Merit List) तयार करण्यात येते. विद्यार्थ्यांना मंजूर झालेल्या शिष्यवृत्तीची रक्कम केंद्रशासनामार्फत थेट विद्यार्थ्यांच्या खात्यात (Under DBT Mode) जमा करण्यात येते.

**केंद्रशासनामार्फत नवीन शिष्यवृत्तीसाठी व नुतनीकरणासाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याची शेवटची मुदत दिनांक ३१.१२.२०२३ अशी निर्धारित करण्यात आलेली आहे.**

शिष्यवृत्ती बाबतच्या संकेतस्थळावरील मार्गदर्शक सूचना (Guidelines) व FAQs काळजीपूर्वक वाचून त्यानुसार सर्व विद्यार्थी व महाविद्यालयांना कार्यवाही करणे आवश्यक आहे. तसेच सदर योजनेबाबतच्या केंद्रशासनाकडील नवीन / सुधारीत प्राप्त सूचनांसाठी www.scholarships.gov.in या संकेतस्थळाचे व या संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळाचे वेळोवेळी अवलोकन महाविद्यालयांनी व विद्यार्थ्यांनी करावे. होकेशनल

❖ **किमान पात्रता व अटी :**

१. अर्जदार भारतीय नागरीक व महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
२. अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्तीचा / स्टायपेंडचा लाभार्थी नसावा.
३. अर्जदाराच्या पालकाचे वार्षिक उत्पन्न रु. ४.५ लाखापेक्षा अधिक नसावे.
४. सदर शिष्यवृत्ती पदवी व पदव्युत्तर व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी आहे. मात्र कोणताही पदविका अभ्यासक्रम तसेच पत्राद्वारा व दूरस्थ शिक्षणासाठी (Diploma, Correspondence Courses & Distance Education) ही शिष्यवृत्ती योजना लागू नाही.
५. केंद्र शासनाच्या नियमानुसार सदर शिष्यवृत्ती, अभियांत्रिकी अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी ४ वर्षे व वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी व कला वाणिज्य व विज्ञान अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना ५ वर्षापर्यंत देय राहील.

❖ **अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे:-**

- **नवीन मंजूरी / (Fresh)-**
  १. इयत्ता १२ वी ची गुणपत्रिका.

D-R. (College)
13/10/23
17/10/23

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
आवक क्र. 2720 दिनांक 16.10.23